53

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2021

ISSUE No- (CCLXXVI ) 276 - D

## Women's Rights : Status & Goa...



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive Editor:
Dr.Virendra K.Jumde
Principal
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

Editor:
Dr. Archana D.Patil
Head, Dept. of Pol. Sci.
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

This journal is indexed in:
Scientific Journal Impact Fac... (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

Late N.P.W. College, Lakhani, Dist. Bhandara
Ref No.
Dt.

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 21 | A Study on Issues and Challenges of Women Empowerment in India<br>Dr.Syeda Najeem Asra Syed Hussain Shaheed | 93 |
| 22 | Women entrepreneurship development In india<br>Karishma Sahebrao lomatse | 97 |
| 23 | The Social Status And Role Of Women<br>Ku. Rajashree Sureshrao Kale | 103 |
| 24 | Indian Constitution and women's rights Mangesh G. Wahane | 106 |
| 25 | A step towards digital India movement through library services:Women library professionals involvement. Mangesh Ramrao Bhitre | 111 |
| 26 | "The status and culture of women in modern Indian society"<br>Pandit Manoranjan Sitaram. | 117 |
| 27 | Role of Media in Women Empowerment<br>Mr. Kamalakar M. Sawant | 121 |
| 28 | Present Footing of Women in Indian Society Dr. Narottam Bal | 124 |
| 29 | Panchayat Raj And Women's Leadership<br>Prof. Dr. Ketan G. Wakode | 131 |
| 30 | Women Rights and Dr. Babasaheb Ambedkar<br>Prof. Dr. Mahendra V.Patil | 133 |
| 31 | Women Entrepreneurs – A Scenario in India<br>Prof. Dr. Premchand Gundu Gaikwad | 137 |
| 32 | Mahatma Gandhi's thoughts on women's emancipation<br>Prof. Patil Pramod Jagannath | 141 |
| 33 | Women's Participation In Indian Politics.<br>Prof. Rupesh R. Kuchewar | 146 |
| 34 | Panchayat Raj Institution And Women's Leadership<br>Prof.Ganesh B. Kadam | 150 |
| 35 | A Critical Study of Adjustment Ability of Individual and Team Game Players Participating in State Level Tournaments<br>Dr. Rahul Madhukarrao Rode | 157 |
| 36 | Indian Constitution and Women's Rights<br>Asst. Prof. Shivkanya S. Kadam | 162 |
| 37 | Women's Rights: Status Andgoals Dr. Ruprao Ukandrao Gaikwad | 167 |
| 38 | भारतीय स्त्रियांच्या अधिकाराचे स्वरुप व वास्तव प्रा. सुरेंद्र हरिभाऊ किन्हीकर | 170 |
| 39 | महिला सशक्तिकरण आणि शासनाच्या विविध योजना<br>प्रा. डॉ. सुधीर ग. सहारे | 174 |


Late N.P.W. College, Lakhani, Distt. Bhandara
Ref No.------
Dt.
Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 276 (CCLXXVI) D
ISSN : 2278-9308
March, 2021

# महिला सशक्तिकरण आणि शासनाच्या विविध योजना

प्रा. डॉ. सुधीर ग. सहारे,
स्व. निर्धन पाटील वाघाये महाविद्यालय लाखनी, जिल्हा भंडारा, महाराष्ट्र

प्रस्तावना :—

संपूर्ण जगात भारत देश आपली संस्कृती परंपरा अध्यात्म भौगोलिक विविधता यामुळे ओळखला जातो. भारत देश जगभर पुरुष प्रधान संस्कृतीसाठी प्रसिध्द आहे. भारतातील महिलांना आदि शक्तीचे रूप मानून पुरातन काळापासून त्यांचे पुजन केले जाते. भारत देशात महिला या घरात आणि समाजात बंधनात अडकून पडल्या आहेत. भारतीय महिलांना दुय्यम स्थान दिले जात होते. त्यांचे अधिकार, विकास यापासून त्यांना पूर्णतः दूर केले जात असत. तरीसुध्दा या भारत देशात स्त्री पुरूष समानते च्या गोष्टी बोलल्या जातात. भारत देशात आज महिलांवर होणारा अत्याचार हा मोठ्या स्वरूपात दिसून येतो आहे. महिला देशात सुरक्षित नाही असे मला वाटते. आज देशातील अशा काही राज्यात महिलांवर मानसिक अत्याचार होत आहे त्याचप्रमाणे त्यांचे विनयभंग होत आहे त्यांच्यावर बळजबरी होत आहे. आज देशात बलात्कार महिलांना मारहाण या घटना मोठ्या प्रमाणात होत आहेत. अशा बिकट समस्येला त्यावर उपाय म्हणून समाजात महिलांना सातत्याने सुरक्षा व संरक्षण देण्यासाठी सबलीकरणाचे अभियान राबविण्यास सुरूवात केली आहे.

देशातील शासनाने मोठ्या प्रमाणात महिलांना अधिकार देण्याकरता विविध उपक्रम राबवले आहेत. त्याचप्रमाणे महिलांवर होणाऱ्या अत्याचारावर शासनाने कठोर अशी शिक्षा होईल याकरिता विविध धोरणे अमलात आणलेली आहे. मुळातच भारतीय महिला कधीच अबला नव्हती. प्रत्येक यशस्वी पुरूषामागे एका स्त्रीचा सहभाग असतो असे म्हटले जाते. समाजात अनेक महापुरूष झाले. महापुरूष हे यामुळेच घडले असे म्हणण्यास अतिशयोक्ती होणार नाही. राजमाता जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई, अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले, रमाई आंबेडकर, मदर टेरेसा, सरोजिनी नायडू, इंदिरा गांधी, कल्पना चावला, सुनीता विलियम्स, पी.टी.उषा, आणि इतर अशा अनेक कर्तृत्ववान महिलांनी या देशाचे नाव लौकीक केलेले आहे. ज्याप्रमाणे राजमाता जिजाऊ होत्या म्हणून संस्कार मूर्ती व किर्तीवंत छत्रपती शिवाजी महाराज घडले सावित्रीबाई ची साथ होती म्हणून महात्मा ज्योतिराव फुले घडले, रमाई ची साथ होती म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला गती मिळाली. संविधानाने आज जरी स्त्री व पुरूष यांना समान अधिकार दिले असले तरी भारताच्या पुरूष प्रधान संस्कृती—मुळे आज स्त्री समाज व कुटुंबाच्या बंधनात अडकून पडलेली आहे. पिता, पती आणि पुत्र यांच्या आदेशाने आणि बंधनाने ते आपले आयुष्य काढत आहे. महिला सबलीकरण म्हणजे फक्त कार्यक्रम व्याख्यान घेणे नाहीतर वास्तविक स्थिती महिलांना त्यांच्या क्षमतेची जाणीव करून त्यांना वैयक्तिक स्वतंत्र व निर्णय घेण्याचे अधिकार मिळणे होय. महिला या देशाचा भविष्य घडविण्याची शक्ती आहे आणि ती शक्ती सुदृढ व सक्षम बनवणे ही समाजाची जबाबदारी आहे. आज महिला अनेक सर गाठत आहेत. महिला ह्या भारत नाहीतर तर अनेक देशात विविध मोठ्या पदावर कार्यरत आहेत. जी देशाची धुरा आणि आपल्या परिवाराची धुरा ही सांभाळत आहेत. महिला ह्या सबळ होण्याकरिता शासनाने अनेक उपक्रमांना सुरूवात केलेली आहे. जेणेकरून महिला या प्रत्येक क्षेत्रामध्ये स्वतःची व देशाचे नाव लौकिक करत आहेत.

स्त्रियांची मानसिकता बदलणे हे अतिशय महत्वाचे आहे. ग्रामीण भागात स्त्री अजुनही नाहीत. त्या पुरूषांच्या निर्णयावर अवलंबून असतात. स्त्रियांची निर्णय [illegible] गरजेचे आहे



Late N.P.W. College, Lakhani, Distt. Bhandara
Ref No.......
Dt.
Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

घटनेने यातील अनेक अधिकार दिलेले आहेत. त्याची माहिती त्यांच्या पर्यंत पोहोचली पाहिजे असे प्रबोधनात्मक कार्यक्रम घेणे आवश्यक आहे.

आपल्या देशात सरकारद्वारे महिलांकरिता सुरक्षा अभियान, मातृ दिवस, महिला दिन, बालिका दिन असे अनेक कार्यक्रम राबविले जातात. ज्यामुळे समाजात स्त्री सत्तेचे महत्त्व व अधिकार जागृत करण्याचे काम केले जाते, त्यासोबत आज महिला सबलीकरणाचे धडे देणे अतिशय आवश्यक आहे. ज्या महिलांना सर्वप्रथम समाजात महिलांचे अधिकार व मूल्य त्यांच्यावर होणाऱ्या विघातक प्रवृत्ती अर्थात स्त्रीभ्रूणहत्या, निरक्षरता, लैंगिक अत्याचार, हुंडा प्रथा याचा नाश करण्याची गरज आहे. आज देशात लैंगिक भेदभाव नष्ट करून समानता प्रस्थापित करणे गरजेचे आहे. घरगुती अन्याय व अत्याचार करणाऱ्यांविरूद्ध कठोर कायदे व उपाय योजना करणे गरजेचे आहे. महिलांना शारीरिक, सामाजिक, आर्थिक व मानसिक स्वरूपात सशक्त बनविणे ही समाजाची व शासनाची जबाबदारी आहे.

महिला सशक्तिकरण करण्याकरिता भारत सरकारने खालील प्रमाणे योजना बनवले.

१) **बेटी बचाव बेटी पढाव योजना :—**

या योजनेअंतर्गत मुलीचे अस्तित्व, संरक्षण व शिक्षा या उद्देशाने योजनेची सुरूवात २२ जानेवारी २०१५ रोजी पानिपत, या ठिकाणी कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. या योजनेचा उद्देश भारतामध्ये मुलांच्या लिंग अनुपाता बद्दल लोकांना जागृत करणे होय. कार्यक्रमाचा संपूर्ण लक्ष मुलगा आणि मुलगी यांच्यामध्ये भेद भाव थांबवणे तसेच मुलींना शिक्षा सुरक्षा आणि समान अधिकार देणे आहे.

२) **इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना :—**

महिला व बाल विकास मंत्रालय द्वारे राबवल्या गेलेल्या या योजनेची सुरूवात २८ ऑक्टोबर २०१० ला झाली असून यात वय वर्ष १९ किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या गर्भवती व स्तनपान करणाऱ्या मातेला पहिल्या दोन बालकांच्या जन्मापर्यंत आर्थिक मदत म्हणून ६००० रूपये त्यांना दिले जातात.

३) **कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना :—**

२००४ सालीया योजनेची सुरूवात झाली असून अत्यंत दुरगामी क्षेत्रात ही योजना राबवली जाते. जिथे ग्रामीण महिला साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय स्तरापेक्षा कमी असते. या योजनेत केंद्र व राज्य सरकार ७५% व २५% खर्च देत असते या योजनेअंतर्गत ७५% अनुसूचित जाती, जनजाती, अति दुर्बळ वर्ग अल्पसंख्यांक समुदायातील मुलींना व २५% गरीब पातळीच्या खालील कुटुंबातील मुलीना सम्मिलित केले जाते. प्रामुख्याने अशा मुली ज्या शाळांमधून बाहेर असतात व मुलींचे वय दहा वर्षापेक्षा जास्त असते अशा मुलींची दखल यामध्ये घेतली जाते.

४) **प्रधानमंत्री उज्वला योजना :—**

या योजनेची सुरूवात १ मे २०१६ रोजी झाली असून या योजनेत गरीब महिलांना मोफत एलपीजी गॅस कनेक्शन दिले जाते या योजनेचा मुख्य उद्देश महिला सशक्तिकरणाला पाठिंबा देणे व ग्रामीण क्षेत्रातील सर्व महिलांच्या आरोग्य सुदृढ ठेवणे आहे.

५) **स्वाधार घर योजना :—**

या योजनेची सुरूवात २००१—०२ मध्ये झाली. जी ''महिला व बाल विकास मंत्रालय'' द्वारे राबविले जात आहे. या योजनेचा उद्देश वैश्य वृत्ति पासून मुक्त महिला, सुअलेली कैदी, विधवा स्त्री, अपहरणाद्वारे पिडित महिला, प्राकृतिक आपदा, मानसिक



Late N.P.W. College, Lakhani, Distt. Bhandara
Ref No.
Dt.
Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

स्वरूपाने विकलांग, आणि असहाय्य असलेल्या महिलांना पुनर्वसनाची व्यवस्था करून देत या योजनेअंतर्गत विधवा महिलांना भोजन व घर, त्याचप्रमाणे संकटग्रस्त आलेल्या महिलांना कायदे विषयक सल्ला, चिकित्सक सल्ला त्याचप्रमाणे व्यावसायिक प्रशिक्षणाची माहिती या योजनेत महिलांना दिली जाते.

६) स्त्रियांकरिता प्रशिक्षण व रोजगार योजना :—

या योजनेची सुरूवात १९८६–८७ मध्ये झाली. जी ''महिला व बाल विकास मंत्रालय'' द्वारे चालवली जाते. या योजनेचा मुख्य उद्देश स्त्रियांना आपला व्यवसाय सुरू करता यावा व त्यांची उद्योगातील कौशल्ये वाढावे याकरिता शासन सतत प्रयत्न करीत असते. या योजनेचा लाभ मोठा वर्ग किंवा त्यांच्या अधिक स्त्रिया घेऊ शकतात ज्यात शासन मिळणारे अनुदान हा केंद्र किंवा राज्य यांच्या व देता संस्था सरकार किंवा गैर सरकारी संघटनाहूनला देता.

७) महिला बचत गट योजना :—

महिला बचत गट योजनेच्या माध्यमातून आज महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी यासाठी शासन मदत करत असते बचतगटामुळे महिला अन्याय नागत बोलल्या टाकून दुःखा मधून सावरण्यासाठी शक्ती त्यांना मिळत असते जिद्द मेहनत धाडस स्वबळावर उद्योग व्यवसायातून महिलांना यशस्वीपणे समृद्धी खेचून आणता येऊ शकते त्यासाठी त्यांना शासनाची सदैव साथ मिळत असते.

निष्कर्ष :—

शासनाने महिलांकरिता अनेक योजना सुरू केल्या असून त्या योजना अतिशय दुर्बल आणि ग्रामीण क्षेत्रातील महिलांपर्यंत पोहोचत आहे. महिला प्रशासनाच्या मदतीने सुशिक्षित कौशल्यपूर्ण, आर्थिक दृष्ट्या प्रबळ आणि आपल्या पायावर उभ्या होत आहेत. आज जगाच्या प्रत्येक चांगल्या हुद्द्यावर त्या आपले नाव करीत आहेत. शासनाच्या योजनेचे लाभ घेऊन अतिशय दुर्गम भागातील महिला आपले उद्योगधंदे तसेच आपले संसार व परिवाराला व्यवस्थितरित्या समोर नेत आहेत व समाजात महिला या पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून कार्य करीत आहेत त्याचप्रमाणे त्या अनेक मोठमोठ्या पदावर जाऊन समाजाला पाठबळही देत आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :—

१) महिला सबलीकरण वास्तव्य व्यथा प्रा. रुपाली गायरे पाटील महाराष्ट्र टाइम्स, ११ ऑक्टोबर २०१६.
२) स्त्री सक्षमीकरणावर संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाचे संकेतस्थळ.
३) स्त्री समीकरणाच्या योजना लोकसत्ता ३१ मार्च २०१७.

Late N.P.W. College, Lakhani, Distt. Bhandara
Ref No.-----
Dt.

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara